| | |
|---|---|
| | **एल.ए.सी. क्र. ३४८/२०१३**<br>**मधील अर्ज निशाणी क्र. २६ खालील आदेश**<br>**(CNR- MHWS050002002012 )** |

१.  प्रस्तुतचा अर्ज मयत अर्जदार केवलराव रामधन पवार यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२.  सदरचा अर्ज वाचला. त्यावर गैरअर्जदार क्र. २ यांच्यातर्फे अर्जास देण्यात आलेले म्हणणे विचारात घेतले. अर्जदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.भिंगारे यांचा आणि गैरअर्जदार क्र.१ यांचेतर्फे सहाय्यक सरकारी वकिल यांचा युक्तिवाद ऐकला.

३.  अर्जदार यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, एकमेव अर्जदार केवलराव रामधन पवार हे दिनांक १८.११.२०१५ रोजी मयत झाले व त्यांच्या पश्चात त्यांना पत्नी सतीबाई  केवल पवार, २ मुली आणि ३ मुले असे एकूण सहाजण वारस आहेत. मयताचे मृत्यू प्रमाणपत्र, सरपंच ग्रामपंचायत शेंदोणा यांनी दिलेला वारसाचा दाखला, केवलराव यांचे दिनांक १८.११.२०१५ रोजीचे प्रमाणपत्र आणि सर्व वारसांच्या आधारकार्डांच्या छायाकिंत प्रती दाखल केलेल्या आहेत. तरी मयत अर्जदार यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात यावी.

४.  याउलट गैरअर्जदार क्र. २ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वारस अभिलेखावर घेण्यासाठी खूप विलंब झालेला आहे. तसेच संबंधित वारसांचे वारस प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. तरी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५.  अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, मयत अर्जदार केवलराव रामधन पवार यांनी भूमिसंपादन अधिनियम १८९४ मधील कलम १८ अन्वये प्रस्तुतचा रेफरन्स दाखल केलेला आहे. त्यांच्या मृत्यू नंतर प्रस्तुतचा अर्ज चालविण्याचा अधिकार त्यांच्या वारसांना टिकून राहत आहे आणि वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होउन मिळण्यासाठी दिलेला अर्ज नि.क्र. २५ हा आज रोजीच्या आदेशानुसार मंजूर झालेला आहे. कागदपत्रांची यादी नि.क्र. २४ अन्वये अर्जदाराचे मूळ मृत्यूप्रमाणपत्र, वारसांचा अहवाल, केवलराव रामधन पवार यांचे प्रतिज्ञापत्र आणि वारसांच्या आधारकार्डांच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत.

त्यामुळे  अर्जदारांचे वारस  अभिलेखावर घेणे आवश्यक आहे आणि अर्जदार यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे,

**<u>आदेश</u>**

१] प्रस्तुतचा अर्ज नि.२६ हा मंजूर करण्यात येत आहे आणि मयत अर्जदार केवलराव रामधन पवार यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२] अर्जदार यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे मयत अर्जदार यांचे वारस अभिलेखावर घेउन तशी दुरुस्ती आजपासून १४ दिवसांच्या आत करुन दुरुस्त अर्जाची प्रत अभिलेखावर त्वरीत दाखल करावी.

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.02.16 17:22:31 +0530

स्थळ  : मंगरुळपीर
दिनांक : १६/०२/२०२६.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per original Order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- C.R.Gadge |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :- 16.2.2026 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 16.2.2026 |
| 5) | Order uploaded on | :- 16.2.2026 |